# बोर्ड प्रश्नपत्रिका : जुलै २०१५

## इतिहास व राज्यशास्त्र

**वेळ : २ तास** **एकूण गुण : ४०**

**सूचना:**

i. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

ii. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.

iii. १ ते ५ प्रश्न इतिहास व ६ ते ९ प्रश्न राज्यशास्त्र या विषयावरील आहेत.

**प्र.१. अ. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा:** [३]

१. पोर्तुगीज राजा ________ याने नौकानयनाला उत्तेजन दिले.

(हेन्री, विल्यम, निकोलस)

२. बाल्कन प्रदेश ________ च्या साम्राज्यात मोडणारा प्रदेश होता.

(जर्मनी, तुर्कस्तान, ऑस्ट्रिया)

३. क्रांतीसिंह नाना पाटील यांनी ________ जिल्ह्यात प्रतिसरकारची स्थापना केली होती.

(सोलापूर, सांगली, सातारा)

**ब. 'अ' स्तंभातील घटकांशी 'ब'स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा:** [३]

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| १. | डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम | अ. | जर्मन विचारवंत |
| २. | केमाल पाशा | ब. | भारतीय क्षेपणास्त्र कार्यक्रमाचे जनक |
| ३. | कार्ल मार्क्स | क. | तुर्की जनतेचा पिता (अतातुर्क) |
| | | ड. | फ्रेंच विचारवंत |

**प्र.२. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा (कोणतेही दोन):** [४]

१. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यानंतर युरोपात कोणते धाडसी खलाशी होऊन गेले?

२. आक्रमक राष्ट्रवाद म्हणजे काय?

३. बेनिटो मुसोलिनीची राजकारणात येण्यापूर्वीची पार्श्वभूमी लिहा.

**प्र.३. खालील विधानांची कारणे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा (कोणतेही दोन):** [४]

१. अठराव्या शतकापर्यंत आफ्रिका खंड अज्ञात खंड म्हणून ओळखले जात होते.

२. रशियाचा सर्वांगीण विकास होऊ शकला नाही.

३. दुसऱ्या महायुद्धानंतर सर्वसामान्य लोकांची आर्थिक स्थिती फार दयनीय झाली.

**प्र.४. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३० ते ४० शब्दांत लिहा (कोणतेही दोन):** [६]

१. आमसभेची (UNO) प्रमुख कार्ये कोणती ते लिहा.

२. अमेरिकेने जपानचे खच्चीकरण कसे केले ते स्पष्ट करा.

३. जागतिकीकरणाचे तोटे विशद करा.

**प्र.५. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ६० ते ८० शब्दांत लिहा (कोणतेही दोन):** [८]

१. साम्राज्यवादाचे अनिष्ट परिणाम स्पष्ट करा.

२. जागतिकीकरणाचे स्वरूप स्पष्ट करा.

३. भारतीय स्वातंत्र्य चळवळीची माहिती खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा:

अ. चलेजाव चळवळ ब. आझाद हिंद सेना

**प्र.६. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा:** [३]

१. संसदीय लोकशाही इंग्लंड व _________ या देशात अस्तित्वात आहे.
(भारत, चीन, इटली, अमेरिका)

२. 'आपण दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ आहोत' अशा दाव्यामुळे _________ निर्माण होते.
(समानता, विषमता, संघर्ष, सामंजस्य)

३. _________ ही प्राथमिक राजकीय कृती आहे.
(सरकारवर टीका करणे, धोरण ठरविणे, मतदान करणे, सभांना उपस्थित राहणे)

**प्र.७. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे द्या (कोणतेही तीन):** [३]

१. जनपृच्छा ही संज्ञा कोणत्या अर्थाने वापरली जाते?
२. ताराबाई शिंदे यांचे कुटुंब कोणत्या महापुरुषांचे अनुयायी होते?
३. लोकशाही व्यवस्थेचा गाभा कशाला म्हणतात?
४. भारतात लोकसभेच्या निवडणुकीत सरासरी किती टक्के मतदान होते?
५. सरकारला कोणत्या कारणांमुळे जनतेच्या सुरक्षिततेची अधिक काळजी घ्यावी लागते?

**प्र.८. खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन):** [४]

१. समान राजकीय भूमिका असलेले लोक राजकीय पक्ष स्थापन करतात.
२. भारतात पूर्णपणे एकसंध समाज आढळतो.
३. अमेरिकेमध्ये नागरिकांना शस्त्रे बाळगण्यास बंधने नाहीत.

**प्र.९. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर २५ ते ३० शब्दांत लिहा:** [२]

१. 'राजकीय पक्ष सामान्य जनतेला जवळचे वाटतात.' हे विधान स्पष्ट करा.
२. लोकशाहीची प्रमुख वैशिष्ट्ये लिहा.